फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६७/२०१७
रेखा व ईतर वि. बाळासाहेब

–:: नि.क्र.३७ व ३८ लगत एकत्रित आदेश ::–

अर्जदार आणि त्यांचे अधिवक्ता हजर आहेत. गैरअर्जदार गैरहजर आहेत. त्यांचे अधिवक्ता श्री. यु.एस. बिराजदार हजर आहेत. सदर प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. अर्जदाराने रु.४४,०००/– वसुली करण्यासाठी अर्ज दिलेला आहे. गैरअर्जदाराने दि.१४/०२/२०१६ रोजी ₹५०००/– भरलेले आहेत आणि आजरोजी ₹२०००/– भरण्यासाठी अर्ज नि.३७ दिलेला आहे. परंतु येथे नमूद करणे आवश्यक आहे की, सदर पोटगी ही दि.१३/०८/२०१२ रोजीपासूनची थकीत आहे. यथास्थितीत, गैरअर्जदाराला थोडी–थोडी रक्कम भरता येणार नाही. त्यामुळे गैरअर्जदाराविरुध्द वॉरंट काढणे आवश्यक राहील. सबब अर्ज नि.३७ हा मंजूर करण्यात येते आणि त्याप्रमाणे नमूद रक्कम ₹२०००/– अर्जदाराला द्यावी.

०२. गैरअर्जदाराकडे थकबाकी असलेली रक्कम ₹३७०००/– च्या वसुलीकरिता वसुली वॉरंट काढण्यात यावा.

०३. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.04.20 17:55:30 +0530

ठिकाण – देवणी
दिनांक – २०–०४–२०२६

( शरद अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
देवणी.